**पोलीस अधीक्षक कार्यालय , सातारा**
९३, मल्हारपेठ, सातारा - ४१५ ००१ (Maharashtra)
कार्यालय -०२१६२ २३२२२५ फॅक्स ०२१६२ २३०२३२
(ई-मेल sp.satara@mahapolice.gov.in)

---

क्रमांक – ७६५/वानिशा/वाहतुक व्यवस्थापन आदेश/२०२६ दि.१२/०९/२०२६.

---

***प्रेसनोट***

श्री गणेश उत्सव २०२६ च्या अनुषंगाने सातारा शहरात नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून तसेच वाहतूकीची कोंडी होऊ नये, अपघात घडू नये अथवा कोणताही अनुचित प्रकार होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी दि. १४/०९/२०२६ चे सकाळी १०:०० वा. पासून ते २५/०९/२०२६ चे रात्रौ. १०.०० पर्यंत सातारा शहरातील अंतर्गत वाहतुक व्यवस्थापनात खालीलप्रमाणे बदल करणेत येत आहे.

१) सातारा शहरात वाहतुकीच्या रस्त्यावर ज्या बाजुला गणेश मंडळांचे मंडप आहेत त्याच बाजुस दिनांक १४/०९/२०२६ ते दिनांक २५/०९/२०२६ पर्यंत वाहने पार्किंग करावीत.

२) सातारा शहरात येणारी अवजड वाहने ही सकाळी ०६.०० वा ते सकाळी १०.०० वा पर्यंतच रस्त्यावर येतील. अन्य वेळेत येणाऱ्या अवजड वाहनांवर कायदेशिर कारवाई केली जाईल.

३) राजपथ रोड, शाहु चौक ते समर्थ मंदिर रोड, मोती चौक ते पोवई नाका रस्त्यालगत असणारी बेवारस वाहने/ कायम रहिवासी नागरीकांची वाहने दिनांक १४/०९/२०२६ ते २५/०९/२०२६ पर्यंत रस्त्यावरुन काढुन पर्यायी पार्किंगमध्ये लावावीत.

४) सातारा शहरात खरेदी साठी चारचाकी वाहन घेवुन येणाऱ्या नागरीकांनी आपले वाहन तालीम संघ तसेच राजवाडा येथील आळूचा खडडा वाहनतळ येथे पार्किंग करावी

**तरी या बदलाची सर्व नागरीकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.**

---

**प्रति - संपादक**

**आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिदध व्हावे**

Scanned with CamScanner